# महिन्याचा विचार

**भावना कर्मयोग-साधनेचा महत्वाचा घटक!**

कर्मयोगाने गुरूदेवांना बहाल केलेल्या फळांची आता चर्चा करू या. क्षणभरासाठीही त्यांच्या अंतर्मनात आपल्याला स्थान मिळाले तर या योग्याने आपल्या प्रत्येक कृत्याला योगसाधनेत कसे रूपांतरीत केले हे गुपित आपल्याला समजून येईल. आपणांस ज्ञात असलेल्या एकापेक्षा अधिक किंवा सर्व प्रकारच्या सेवांची देणगी बहाल करणाऱ्या व्यक्तिंची अथवा संस्थांची माहिती नक्कीच सगळ्यांना असेल. मग याला गुरूदेव अपवाद कसे? एखादा समाजसेवक देवमाणूस या पदवीला पात्र का होऊ शकला नाही याचा विचार केला असता जाणवते की हा फरक अंतर्मनाचा असतो, व्यक्तीचा कल कसा वेगळा आहे यावर अवलंबून असतो.

तो फरक असतो - ''भाव''! या भावाचे कालांतराने अनुभवात रूपांतर होते. याकडे दुर्लक्ष ही अक्षम्य चूक ठरू शकते. योग्य स्वभाव आणि सद्भावनेने केलेली एखादी छोटीशी नि:स्वार्थ सेवेची कृतीही क्षणार्धात व्यक्तीला विद्वत्ता, स्वभान बहाल करू शकते. मात्र भाव योग्य नसतील, आपल्या स्थानी नसतील तर जन्मभर रूग्णांची, गरिबांची, गरजूंची समाजात केलेली सेवाही फक्त काही मूठभर प्रशंसकांचे कौतुक प्राप्त करू शकते. योगसाधना ही आंतरिक



प्रक्रिया असते हे आपण क्षणभरही विसरून जाता कामा नये. व्यक्तीच्या आत्म्याचा परमात्माशी संयोग हा योग क्रियेद्वारे साध्य होत असतो आणि हेच अंतिम सत्य असते. हा संयोग आपल्या हाताने, पायांनी किंवा इतर अवयवांद्वारे साधत नाही तर आपल्या अंतरंगातील चेतनेद्वारेच हे शक्य असते. योग क्रियेचे हे सर्वात मोठे साधन असते.

अशा चेतनेच्या, संस्कृतीच्या अभावामुळेच बऱ्याच वैद्यकिय व्यावसायिकांचे रूग्णसेवेचे व्रत अपयशी ठरू शकते. गुरूदेवांचे याबाबतीतील वैशिष्टये अभ्यासू या.

कर्मयोगाचे पहिले आकलन म्हणजे सर्व विश्वाचा कर्ता आणि करविता फक्त भगवंत असतो. मन या संदर्भात पटकन आदर्शवादाकडे वळणे सहज शक्य असते पण यावेळी थोडी खबरदारी घेणे आवश्यक असते. विश्व हा मनाचा खेळ असतो किंवा विश्व हे भूत/वर्तमान/भविष्य या त्रिमितीत संभवत नाही, अस्तित्वात नसते असे वाटणे स्वाभाविक आहे. ही जाण स्वत:ला कायम असते असे मानणाऱ्या सर्वांपासून ही जाण खूप दूर असते.

अशी व्यक्ती फक्त स्वत:चे सहानुभूतीशून्य वर्तन, पाप युक्त मन आणि आळशी स्वभाव प्रक्षेपित



करत असते. त्याच्या कॉफीत थोडी साखर घालायला जरी तुम्ही विसरलात तरी पटकन अशा व्यक्तीचा स्वभाव कळू शकतो. जगाला फसविणे अर्थहीन असते. अंतत: ही स्वत:चीच फसवणूक ठरते आणि मग पराभूत कोण?

गुरूदेवांनी एक विलक्षण सूत्र सांगितले आहे - ''सर्व भौतिक घटकांची बेरीज विराट असते. सर्व मने एकत्रित केली तर हिरण्यगर्भ तयार होते तर सगळे आत्मे एकत्र आणले की, त्यांची बेरीज ईश्वर असते.'' या सूत्रातून देह, मन आणि आत्मा यांचे बंध प्रकट होतात. विश्व अस्तित्वात आहे तोवर दु:खी व्यक्ती असणारच आणि त्यामुळे त्यांच्याप्रती दानधर्म म्हणजेच तुमची ईश्वर प्रीती असणार आहे, हेही लक्षात ठेवायला हवे. विश्वाच्या पसाऱ्यात सर्व प्राणिमात्र आपल्याला आपला आत्मा दिव्यत्वात विलीन करण्याची आणि शेवटी त्या तत्वात एकरूप होण्याची संधी देत असतात (क्रमश:)

**SIVANANDA'S INTEGRAL YOGA**

(By Swami Venkatesananda)

Do not waste your days and weeks. Time is precious. Years will roll away in a flash. Remember death. Earnestly try for perfection. Remember the pains of Samsara. Do not be deceived and duped by the worthless objects of this world. Remember God in whom lie highest peace and supreme bliss. Remember the saints daily. They have shown you the way to cross beyond sorrow and pain and triumph over death and attain immortality. Constantly remember the Eternal Divine Reality. Grow in virtue. Cultivate noble good qualities. Do all your work worshipfully. Offer up every action to God. Spiritualise your entire life. So says Sivananda Gurudev.

- Swami Chidananda

Gurudev Sivanandaji infuses in his sayings hope and high ideals of life. He conveys that mistakes are lessons in wisdom. It is more difficult not to feel hurt than not to hurt others. Suffering purifies a man and this applies to both who hurts and feels hurt. A sinner of today has potential to become saint of tomorrow.

Gurudev says that while scientist conquers external nature, saint or a Yogi conquers mind and internal nature.



## दिव्य जीवन संघ, पुणे शाखा वृत्तांत

✻ मार्च २०२२ महिन्याचा सत्संग दि. २० तारखेला आपल्या शाखेचे सदस्य श्री वसंतराव लष्करे यांच्या निवासस्थानी झाला, ज्यांना प्रत्यक्ष उपस्थित राहता आले नाही त्यांनी सत्संगात ऑनलाईन सहभाग नोंदवला.

✻ ''दिव्य जीवन'' या आपल्या मासिकपत्रिकेचा मार्च २०२२ महिन्याचा अंक परिवारातील सदस्यांना हार्ड आणि सॉफ्ट कॉपी तसेच व्हॉट्सअप द्वारे पाठविण्यात आला.

## पुणे शाखेचा पत्ता

श्री.नितीन देशपांडे
'ईशावास्य' प्लॉट नं. ४९/सायंतारा, डी.एस.के. विश्व, धायरी, पुणे ४११०६८,
मो.नं. ९८५०९३१४१७

बुक पोस्ट

प्रति





# दिव्य जीवन



वर्ष १७/अंक ४
एप्रिल २०२२

हृषीकेश येथील शिवानंद आश्रमात २२ मार्च ते २५ एप्रिल या कालावधीत परमपूज्य ब्रह्मकालीन श्री. स्वामी कृष्णानंद महाराजांच्या जन्मशताब्दी निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे.